आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

शनिवार, दिनांक : १७ ऑगस्ट, २०२४

ठळक बातम्या

1. अनिश्चितता, भूराजकीय युद्ध, रोगराई अशा जागतिक आव्हानांचा सामना विकसनशील देशांनी एकजुटीनं करावा, असं पंतप्रधानांच ग्लोबल साऊथ शिखर बैठकीत आवाहन.

2. लाडक्या बहिणींच्या जीवनात सुखाचे-आनंदाचे क्षण यावे हीच या भावाची इच्छा-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुण्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या राज्यस्तरीय शुभारंभा प्रसंगी प्रतिपादन.

3. विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये दुध संकलन वाढण्यासाठी विद्यापीठ आणि संशोधन संस्थांनी नव संशोधनाद्वारे पुढाकार घेण्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नागपुरात आवाहन.

आणि

4. कोलकाता येथील घटनेच्या निषेधार्थ राज्यभरात डॉक्टरांचे आंदोलन; डॉक्टरांच्या सुरक्षेसंदर्भात करायच्या उपाययोजना संदर्भात एक समिती स्थापन करण्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचं आश्वासन.

######

ग्लोबल साऊथ

व्हॉईस ऑफ ग्लोबल साऊथ संघटनेची तिसरी शिखर बैठक आज दूरस्थ पद्धतीनं सुरु झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बैठकीचं उद्घाटन केलं.

अनिश्चितता, भूराजकीय युद्ध, रोगराई अशा जागतिक आव्हानांचा सामना विकसनशील देशांनी एकजुटीनं करावा, असं आवाहन त्यांनी केलं. व्यापार आणि दळणवळणाला प्रोत्साहन, शाश्वत विकास उद्दिष्ट आणि महिलांचा; 'विकास प्रक्रीयेत' वाढता सहभाग या मुद्द्यांवर भारत प्रतिबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं. ग्लोबल साऊथ देशांमधे डिजिटल पायाभूत सेवा-सुविधा उभारण्यासाठी सामाजिक प्रभाव निधीची स्थापना भारताने केली असून प्रथम योगदान म्हणून अडीच कोटी डॉलर्सचा निधी दिला आहे, अशी माहिती मोदी यांनी दिली.

जगातल्या विकसनशील देशांच्या साऊथ ग्लोबल संघटनेची ही तिसरी बैठक या वर्षात होत असून 'शाश्वत विकासाकरता - सक्षम साऊथ ग्लोबल' अशी या बैठकीची संकल्पना आहे. सदस्य देशांचे परराष्ट्र व्यवहार, अर्थ, युवा, आरोग्य, वाणिज्य, माहिती आणि प्रसारण, पर्यावरण तसंच शिक्षण खात्यांचे मंत्री – अधिकारी दूरस्थ पद्धतीने बैठकीत सहभागी झाले आहेत.

लाडकी बहीण योजना राज्यस्तरीय उद्घाटन

'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'चा पुण्याच्या बालेवाडी स्थित शिवछत्रपती क्रीडानगरी येथे राज्यस्तरीय शुभारंभ आज करण्यात आला. महिलांच्या जीवनात सुखाचे, आनंदाचे दिवस यावे हीच भाऊ म्हणून प्रामाणिक इच्छा आहे आणि म्हणूनच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये माहेरचा अहेर मिळणार आहे, अशी भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली. या सोहळ्याला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे उपस्थित होते.

महिलांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्ट पर्यंत मुदत आहे. अर्ज भरल्यानंतर त्यांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची एकत्रित रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. काही महिलांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडले गेल्यानंतर त्यांच्या खात्यात रक्कम जमा होईल. प्रत्येक पात्र भगिनीला योजनेचा लाभ दिला जाईल अस मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केल.मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी मार्च २०२५ पर्यंतची तरतूद केली असून पुढेही दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.bआजपर्यंत १ कोटी ३ लाख रुपये माता-भागिनींच्या बँक खात्यात जुलै व ऑगस्ट महिन्याचे मिळून ३ हजार रुपये जमा करण्यात आल्याच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितल.

यावेळी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक विजेत्या स्वप्नील कुसळेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते महिला बचत गटांना मार्गदर्शन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'यशस्विनी प्लॅटफॉर्म' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात योजनेच्या धनादेशाचे आणि स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी गट-ब साठी संयुक्त चाळणी परीक्षेचं उद्या १८ ऑगस्टला तर, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ या परीक्षेचं आयोजन येत्या २५ तारखेला करण्यात आले आहे. यासंदर्भातली माहिती आयोगाकडून देण्यात आली.

दरम्यान १८ व २५ ऑगस्ट रोजी IBPS ने देशपातळीवर परीक्षा आयोजित केलेल्या असताना त्याच तारखांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगानेही परीक्षा

आयोजित केल्या आहेत, यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. एमपीएससीने परिक्षांच्या तारखांमध्ये बदल करुन दोन तीन दिवसांनी परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अन्यथा उच्च न्यायालयात दाद मागू, असा इशारा काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी आज मुंबईमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत दिला.

गडकरी जनसंपर्क

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम उद्या रविवारी सिव्हिल लाइन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. यावेळी मंत्री महोदय फक्त नागपूर सुधार प्रन्यासशी संबंधित विषयांवरील निवेदने स्वीकारणार आहेत. सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीत गडकरी देशपांडे सभागृहात उपस्थित राहतील. यावेळी ते एनआयटीशी संबंधित समस्यांची सुनावणी करतील. नागरिकांनी आपल्या समस्या या जनसंपर्क कार्यक्रमामध्ये मांडाव्यात, असे आवाहन एनआयटीतर्फे देखील करण्यात आले आहे.

गडकरी डेअरी कॉन्फरन्स

विदर्भातील 11 जिल्ह्यांमधील दूध संकलन हे प्रतिदिवशी 5 लाख लिटर असून ते पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर सातारा सांगली यांच्या तुलनेत खूपच कमी आहे ही स्थिती बदलण्यासाठी महाराष्ट्र पशु विज्ञान आणि मत्स विज्ञान विद्यापीठ माफसू तसेच अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांनी ‘काऊ फार्म्स’ निर्माण करून देशी वाणाच्या गायींचे इम्ब्रीयो ट्रान्सफर च्या माध्यमातून शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये खाजगी सार्वजनिक भागीदारी- पीपीपी प्रारूपाच्या आधारे पशुवैद्यकीय तंत्रज्ञांच्या मदतीने विदर्भात किमान 20 लीटर प्रतिदिन दूध देणारे 10 हजाराच्यावर पशुधन विकसित करावे असे आवाहन आज

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. नागपूरच्या सेमिनरी हिल्स येथील माफ्सूच्या सभागृहात इंडियन डेअरी असोसिएशन वतीने आयोजित दुग्ध व्यवसायावरील राष्ट्रीय परिषदेला ते आज संबोधित करत होते याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, भारतीय कृषी विज्ञान परिषदेचे उपमहासंचालक डॉ. राघवेंद्र भट, नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड चे अध्यक्ष मिनेश शहा, इंडियन डेअरी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आर एस सोधी प्रामुख्याने उपस्थित होते

विद्यापीठ आणि संशोधन संस्थानी तंत्रज्ञानाचा वापर हा तळागाळापर्यंत पोहोचवणे आवश्यक असून सिद्ध झालेलं तंत्रज्ञान, त्याची आर्थिक व्यवहारिता, कच्च्या मालाची उपलब्धता आणि अंतिम उत्पादनाचे चांगले विपणन या गोष्टीवर भर देऊन दुग्ध व्यवसायाला चालना देण्याचा प्रयत्न डेअरी व्यवसायाशी तसेच डेअरी संशोधनाशी संबंधित संस्थांनी करावा असे देखील गडकरी यांनी यावेळी नमूद केलं.

याप्रसंगी प्रास्ताविक मानताना एनडीडीबीचे अध्यक्ष मिनिश शहा यांनी सांगितले की नागपूरच्या बुटीबोरी येथे 6 लाख लिटर प्रति दिवस क्षमतेचा दुध प्रक्रिया प्रकल्पासाठी जमीन मिळाली असून त्याची क्षमता 10 लाख प्रति लिटर प्रति दिवस करण्याचा मानस आहे. पुढील वर्षापासून या प्रकल्पाचे संचालन होणार असून या माध्यमातून पनीर, दही, मिठाईचे उत्पादन होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केलं. या कार्यक्रमाप्रसंगी सर्वश्रेष्ठ डेअरी प्लांटचा पुरस्कार हा महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संस्थेला मिळाला तर उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार महाराष्ट्र मधून लता रेडेकर या या महिलेला मिळाला. याप्रसंगी माफसूचे अधिकारी, शिक्षक, डेअरी व्यवसायाशी संबंधित व्यावसायिक, तंत्रज्ञ आणि दुग्धव्यवसायिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉक्टरांचा बंद

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयातील महिला अत्याचाराच्या घटनेनंतर देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ भारतीय वैद्यकीय संघटनेनं आज एक दिवसाचा देशव्यापी संप पुकारला असून राज्यातही अनेक वैद्यकीय संघटना संपात सहभागी झाल्या आहेत.

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या नागपूर शाखेच्या वतीने आज 17 ऑगस्ट सकाळी 6 वाजल्या पासून ते 18 ऑगस्ट सकाळी 6 पर्यंत बंद पुकारण्यात आला असून इंडियन मेडिकल असोसिएशनच्या परिसरात निषेध आंदोलन करण्यात आले तसेच या घटनेचा निषेध नोंदविता मुलीला न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी IMA ने तसेच डॉक्टरांनी यावेळेला केली. नागपूरच्या साऊथ अंबाझरी रोड स्थित आय एम ए हॉल येथे देखील वैद्यकीय विद्यार्थ्यांनी घोषणा देत आपला निषेध नोंदवला .

याच घटनेच्या निषेधार्थ यवतमाळ मध्ये आयएमए सह डॉक्टरांच्या विविध संघटनांनी मूकमोर्चा काढला. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून हा मोर्चा निघाला. यावेळी खाजगी व जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी वैद्यकीय सेवा बंद ठेवल्या.

भंडारा जिल्ह्यातील डॉक्टर संपावर गेले असून आरोपीवर कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी भंडाऱ्यात मोर्चा काढण्यात आला आहे.

डॉक्टर सुरक्षा

डॉक्टरांच्या सुरक्षेसंदर्भात करायच्या उपाययोजनासंदर्भात एक समिती स्थापन करण्याचं आश्वासन केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं दिलं आहे. डॉक्टरांच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी आज नवी दिल्लीत

मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यावेळी अधिकाऱ्यांनी हे आश्वासन दिलं. या समितीमध्ये डॉक्टरांचे प्रतिनिधी, राज्य सरकार यांचेही प्रतिनिधी असतील. डॉक्टरांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी २६ राज्यात कायदे मंजूर झालेले आहेत. डॉक्टरांनी आंदोलन मागे घेऊन कामावर रुजू व्हावं असं आवाहन केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं केलं आहे.

हवामान

विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आज मुसळधार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला असून उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा नागपूरच्या हवामान केंद्राने जारी केला आहे. दरम्यान गेल्या 24 तासात गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड इथं 63. 5 मिलिमीटर तर बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा इथं सर्वाधिक 56. 7 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आली आहे.

######